# अनुबंध

त्रैमासिक ऑक्टोबर २०१५



## अनुबंध
त्रैमासिक, वर्ष १ अंक 3

संपादक: शिल्पा कुळकर्णी

संपादन सहाय्य: प्रिया वैद्य

अंक मांडणी आणि सजावट
शिल्पा कुळकर्णी

न्यू इंग्लंड मराठी मंडळ कार्यकारिणी

प्रशांत कुलकर्णी: अध्यक्ष
संतोष साळवी: उपाध्यक्ष
सुहास कासार: कोषाध्यक्ष
शिल्पा कुळकर्णी: सचीव
वैशाली प्रभू
सारिका कुलकर्णी
बकुल कानडे
राहुल गाडे
जितेंद्र कुळकर्णी
श्रीकांत सावंत
अक्षय फुलगीरकर

मुखपृष्ठ: ओंकार वेर्णेकर

# संपादकीय

प्रिय वाचकहो,

**ऋतूचक्र-** अर्थात कालचक्र. चक्र हे गतीचे द्योतक आहे. ऋतूचक्र म्हणजे उत्पत्ती, लय स्थिती. सृष्टीत बदल होतात ते या ऋतूचक्रामुळेच. हे बदल प्रामुख्याने दिसून येतात ते निसर्गाच्या बदलत्या रंग-छटांमधून. या चक्रामधील पहिला ऋतू 'वसंत'. नवनिर्मितीच्या, नवचैतन्याच्या या ऋतूचे प्रतिक आहे 'गुलाबी' रंग. तर उन्हाच्या हाळा मारणाऱ्या, रखरखीत वातावरणाच्या ग्रीष्माचा रंग 'लाल'. यात गुलमोहर, पळस या झाडांना फुलं येतात ती जणू काही अग्नीची प्रतिक असतात. ग्रीष्माची तगमग संपवणारा 'वर्ष ऋतू' हा तिसरा ऋतू- पावसाच्या संतत धारांनी धरतीची तृषा शांत करणारा, 'हिरव्या' रंगाच्या विविध छटांची मुक्त हस्ताने उधळण करणारा, कधी कधी आकाशाच्या प्रांगणात इंद्रधनूची कमान उमटवणारा! सर्वांना आनंदाच्या झुल्यावर झुलवून वर्षाऋतू निरोप घेतो व 'पिठूर, पांढर शुभ्र, टपोर चांदण घेऊन दिमाखात अवतरतो तो 'शरद'. अति उत्तरेच्या प्रदेशांत हे पानगळीचे दिवस! लाल, पिवळा व शेंदरी अश्या मिश्र रंगांचे दालन या दिवसांतच येथील सृष्टी उघडते. हा शरद ऋतू चाहूल घेऊन येतो ती नंतर येणाऱ्या अतिशय कडक थंडीची. दव, धुक्याचे व हिमाचे अवगुंठन लेवून येणाऱ्या 'हेमंताची'. पांढरा रंग हीच त्याची ओळख. निष्पर्ण झाडे, दिवस लहान व रात्र मोठी त्याच बरोबर उत्तरखंडात बर्फाच्या शुभ्र, धवल राशी म्हणजेच हेमंत ऋतू.

या कालचक्रातला शेवटचा सहावा ऋतू- 'तपश्च तपस्यश्च शौशिरावृतू'. तपस म्हणजे माघ व तपस्य म्हणजे फाल्गून या दोन महिन्यांचा काळ हा शिशिर ऋतूचा काळ. 'तपकिरी' हे याचे रंग वैशिष्ट्य. या काळात बर्फाचा थर कमी झालेला असतो. झाडांचा, मातीचा रंग तपकिरी दिसतो. आम्रवृक्षाला हळूहळू पालवी येत असते. हेमंताचा अंत व वसंताचा आरंभ अश्या सीमारेषेवर उभा असणारा ऋतू 'शिशिर'! असे हे 'सहा ऋतूंचे सहा रंगसोहळे' या ऋतूच्या चक्रामुळे चराचराला अनुभवायला मिळतात.

तर, यावेळच्या अंकात आपणांस काय वाचावयास मिळेल? 'संवेदना' या स्वमग्न मुलांच्या शाळेची माहीती देणारा लेख वाचावयास मिळेल. गणेशाच्या विविध रंग प्रतिमा बघावयास मिळतील. आरोग्यविषयक 'अभ्यंग' हा माहितीपूर्ण लेख, 'ओंजळीतील फुले' चा पुढचा भाग, ' पाऊस पहिला माझ्या मनातला ', 'तो न मी', असे वेगळ्या धाटणीचे ललित, 'पुस्तकाविषयी' हे क्रमशः सदर तर 'चंदेरी दुनियेत', हे सुरु होणारे नवीन सदर या अंकात समाविष्ट केले आहेत. 'स्वित्झर्लंड' मधील स्वर्गीय निसर्ग आपल्या लेन्स मधून टिपून त्या प्रवासाची कथा फार सुंदर रित्या उलगडली गेली आहे ' एका प्रवासाची चित्र कथा' या मधून! याच बरोबर नेहमीसारखे 'रंगीबेरंगी बाल जगत' तर आहेच!

सहा ऋतूंमधील विविध रंगांच्या सुंदर गोफासारखा वेगवेगळ्या विषयांवरच्या, लेख, कविता, नवीन-क्रमशः सदर यांनी व लहान-मोठ्यांच्या कुंचल्यातून रेखाटलेल्या चित्रांनी विणलेला या वेळचा 'अनुबंध' आपल्या समोर ठेवत आहे.

आपली शुभाकांक्षी,
शिल्पा कुळकर्णी

# अंतरंग


## अध्यक्षीय

प्रशांत कुलकर्णी

## लेख

| | |
|---|---|
| संवेदना स्वमग्न मुलांची शाळा | सौ. दिपाली फडके खानझोडे, मंजुषा लागू |
| पाऊस पहिला माझ्या मनातला | अल्पना कशाळकर |
| पुस्तकाविषयी थोडेसे | जुई नवरे |
| अभ्यंग | डॉ. शर्वाणी कुळकर्णी |
| तो न मी | श्वेताली कुलकर्णी |
| चंदेरी दुनियेत : फिल्मी फेरफटका | श्रीनिवास जांभेकर |
| मितवा सिनेमा-Review | प्राजक्ता आठल्ये |
| LIFE | वेद ढोले |
| ओंजळीतील फुले | संगीता देसाई-कुळकर्णी |
| गाणी - भाषा आणि परिभाषा | प्रिया वैद्य |
| एका प्रवासाची चित्र-कथा: स्वित्झर्लंड | छायाचित्रकार: गौरी धायगुडे |

## कविता

अल्पना कशाळकर

## रंगीत रेखाटने

प्रसाद आठल्ये    इशा खानझोडे    केदार कोल्हटकर    प्रणोती नवरे    अनिल वेर्णेकर

## रंगबेरंगी बाल जगत

अर्णव जोशी    शरयू जोशी    शाल्मली कुलकर्णी    सिद्धार्थ निरगुडकर    आर्यन किन्हीकर

स्वरा गुरव    विदुला कुंटे    स्मिता भोगले

माशी झाला मंत्री- रोहिणी जोशी


- या अंकात व्यक्त झालेल्या सर्व मतांशी संपादक अथवा कार्यकारी मंडळ सहमत असेलच असे नाही
- अंकासाठी सर्व काळजी घेतली गेली असली तरी छपाईत किंवा अन्य इतरत्र काही चूक भूल झाली असल्यास उदार मनाने ती नजरेआड कराल अशी आशा आहे.
- साधारण पंधरा दिवस आधी संपादकाच्या हाती आलेले साहित्य व लिखाण नजीकच्या अंकात प्रसिध्द करण्याचे सर्व प्रयत्न केले जातील.
- साहित्य व लिखाण मिळाल्याची पोच इमेल द्वारा दिली जाईल.
- या अंकातील आतील सजावटीसाठी वापरण्यात आलेली सर्व चित्रे इंटरनेट वरून घेण्यात आलेली आहेत.

साहित्य व मजकूर पाठविण्यासाठी संपर्क :

**संपादक: शिल्पा कुळकर्णी; shilpa.kulkarni@nemm.org**

# अध्यक्षीय

नमस्कार मंडळी

गणेश उत्सव म्हणजे आपल्या सर्वांचा एकदम लाडका सण. आपण सर्व जण आपल्या घरी गणेश उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करतो. त्यानिमित्ताने मित्र मंडळी एकत्र येतो, गणपतीची प्रतिष्ठापना करतो आणि मोठ्या भक्तिभावाने त्याचे पूजन करतो. बाप्पा बरोबरचे काही दिवस कसे भर्रकन निघून जातात हे समजतच नाही!

NEMM च्या माध्यमातून आपण गणपती उत्सव नेहमीच उत्साहात साजरा करत आलो आहे. यावर्षाच्या सुरुवातीसच आमच्या कमिटीने गणपती उत्सवाच्या निमित्ताने community program करण्याचा निर्णय घेतला की ज्यायोगे अनेक स्थानिक उत्साही कलाकारांना त्यात सामावून घेता येईल. खरं तर असा मोठा कार्यक्रम करायचा म्हणजे भरपूर कष्ट आणि तयारी लागते. त्याच बरोबर गेल्या काही वर्षामध्ये एवढा मोठा स्थानिक कार्यक्रम झाला नव्हता आणि आमच्या कडे फारसा अनुभव नव्हता. त्यामुळे हे आव्हान स्वीकारताना थोडी अस्वस्थता जाणवत होती. पण आमच्या मंडळाच्या सेक्रेटरी शिल्पा कुळकर्णी यांनी या पूर्ण कार्यक्रमाची जबाबदारी घ्याचे ठरवले. त्यांना सर्वतोपरी मदत करायची खात्री पूर्ण कमिटीने दिली आणि मे महिन्यापासूनच आम्ही कामास सुरुवात केली!

सर्वात पहिला प्रश्न होता की कार्यक्रमाची theme काय ठेवायची? त्यामध्ये २-३ प्रस्ताव होते पण यापूर्वी NEMM मध्ये झालेल्या विषयावर पुन्हा कार्यक्रम करायचा नाही असे आमचे सर्वांचे ठाम मत होते. शेवटी 'मराठी सिनेमा' हा विषय ठरला आणि या विषयावर research सुरु झाला. खरतर हा विषय एवढा व्यापक आहे की आम्ही कुठल्याही नाच-गाण्यांचा समावेश करून कार्यक्रम करू शकलो असतो. पण आम्ही विचारपूर्वक प्रत्येक दशकातील एखादी तरी झलक दाखवायचा नक्की केलं ज्यायोगे त्या कलाकृतींना न्याय मिळेल आणि त्यानुसार कामाला लागलो. पाहता पाहता 'राजा हरिश्चंद्र' पासून 'हरिश्चंद्राची factory' पर्यंतचा प्रवास दाखवणारा कार्यक्रमाचा आलेख तयार झाला. यात अनेक गोष्टींचा समावेश करायचं ठरवलं. लहान मुला-मुलींचे नाच ठरवले. अजरामर गाणी (live orchestra सह) घ्यायची ठरवली. लावणी, जोगवा असे लोकनृत्य प्रकार ठरवले. नव्या दमाची आणि चालीची गाणी ठरवली त्याच बरोबर मराठी चित्रपट सृष्टी गाजवणाऱ्या दादा कोंडके आणि अनेक कलाकारांना मानवंदना करणारे segment ठरवले. या सर्वांची गुंफण घालणारे स्क्रिप्ट जून महिन्यापर्यंत तयार झाले आणि त्यानंतर आम्ही कार्यक्रमाच्या बाकीच्या गोष्टीवर लक्ष केंद्रित करायला लागलो.

या प्रवासाचा पुढचा टप्पा होता तो कलाकार आणि choreographers (नृत्य दिग्दर्शक) ठरवायचा. त्यासाठी आम्ही सर्व लोकांना जाहीर आवाहन केलं. मला अभिमानाने सांगावे वाटते की याला १०० पेक्षा जास्त कलाकारांनी प्रतिसाद दिला. काही जणांना तर एकापेक्षा जास्त segment मध्ये भाग घ्यायचा होता. पण अनेक कलाकार असल्याने ते शक्य नव्हतं. मुलांच्या शाळा संपल्यानंतर प्रत्येक segment च्या practices जुलै महिन्यापासून सुरु झाल्या. अनेक लोक एकमेकापासून खूप दूर राहात असल्याने अनेकदा practice ला जायचे म्हणजे एक एक तास प्रवास करायला लागायचा. तसेच काही घरातील २-३ लोक पण या कार्यक्रमात सहभागी! त्यामुळे रोज कुणाची ना कुणाची practice असायची. तरीही कुरकुर न करता सर्वजण practice ला उत्साहात उपस्थित असायचे. शिवाय या practices साठी अनेक लोकांनी आपले स्वतःचे घरही उपस्थित करून दिले. या बद्दल या सर्व हौशी कलाकारांचे आभार मानावेत तेवढे कमी आहेत!

तुमच्या पैकी ज्या लोकांनी अशा कार्यक्रमात भाग घेतला असेल त्यांना याची पूर्ण कल्पना असेल की असा कार्यक्रम सफल होण्यासाठी पडद्या मागच्या अशा अनेक गोष्टी असतात ज्यासाठी जय्यत तयारी लागते. या मध्ये stage ची सजावट, audio-video, मेक अप, lights, backstage management अशा अनेक बाबी आल्या. या सर्व जबादारी सांभाळायला अनेक volunteers पुढे आले आणि कार्यक्रमाची तयारी पूर्ण झाली.


या कार्यक्रमाची केवळ कलाकारच नाही तर आमचे सभासद देखील खूप आतुरतेने वाट पाहत होते. त्यामुळे कार्यक्रमाचे registration चार दिवस आधीच संपून गेले आणि नाइलाजाने अनेक उत्सुक सभासदांना कार्यक्रमास येत येणार नाही असे आम्हास सांगावे लागले. कार्यक्रमास उपस्थित राहू शकणार नाही म्हणून अनेक सभासद मनाने खट्टू झाले. आम्ही पण खूप नाराज झालो कारण आम्हालाही सर्व उत्साही लोकांना समाविष्ट करायचे होते. पण auditorium च्या नियम पाळणे आम्हास खूप आवश्यक होते.

शनिवार २६ सप्टेंबर रोजी श्री गणरायाची पूजा करून आम्ही मोठ्या दिमाखात कार्यक्रमास सुरुवात केली. नेहमी प्रमाणे ढोल ताशांच्या गजरात आणि लेझिमीच्या तालावर मिरवणूक काढली. त्यामध्ये सर्व उपस्थित लोक उत्साहात सामील झाले होते. त्यानंतर आमचा 'लख लख चंदेरी' हा कार्यक्रम सुरु झाला. एका पाठोपाठ असे वेगवेगळे segments साजरे झाले आणि लोकांनी त्याला भरभरून दाद दिली. कार्यक्रमाच्या शेवटच्या गाण्यात तर सर्व कलाकार एकत्र समोर आले. अबाल वृद्धांचा समावेश असलेला हा दोन तासांचा कार्यक्रम कधी संपला हे समजलेच नाही!

या कार्यक्रमातील stage वरचे segment तर सर्वांच्या नेहमीच लक्षात राहतील. पण मागे वळून पाहताना अनेक लोकांना असे जाणवेल की यातला खरा आनंद होता तो एकत्र येउन जिद्दीने काहीतरी करून दाखवण्यामध्ये! असं म्हणतात की व्यक्ती तितक्या प्रकृती! जेव्हा वेगवेगळ्या विचारांचे अनेक लोक एकत्र येतात तेव्हा मतभेद होणं हे अगदी स्वाभाविक आहे. पण या गोष्टी मनात न धरता जेव्हा सर्वजण केवळ एकाच ध्येयासाठी मनापासून अन तळमळीने प्रयत्न करतात आणि जेव्हा हे कष्ट साध्य होतात तेव्हा त्यामध्ये फार मोठा आनंद असतो. तो stage वर घालवलेल्या काही मिनिटापेक्षा खूप मोठा असतो. मला वाटतं, या कार्यक्रमाच्या निमित्ताने NEMM ची पूर्ण community एकत्र आली. यातून सर्वांना नकळत नवे मित्र आणि मैत्रिणी कधी मिळाले हे समजलं देखील नाही. यातच या कार्यक्रमाची खरी सफलता आणि सौंदर्य दडलेलं आहे!

धन्यवाद.

**प्रशांत कुलकर्णी**
**अध्यक्ष**
**NEMM**




-इशा खानझोडे




# संवेदना स्वमग्न मुलांची शाळा

## (School for Autistic Children)

Autistic Children (स्वतः मधे मग्न असणारी मुले), इथे अमेरीकेत अनेक लोकांना Autism बद्दल माहिती आहे. पण भारतात अजूनही Autistic kids ना मतीमंद म्हणूनच बघितले जाते . Autistic Kids ची लक्षण बघितली तर स्वतः मध्ये रमणारी ही व्याख्या अचूक बसते म्हणून हे शाळेचे नाव. ही शाळा माझ्या आईने तिच्या वयाच्या ५५-५६ व्या वर्षी नागपूर मधे उघडलेली पहिली शाळा, जी फक्त स्वमग्न आणि ज्यांचा विकास इतर मुलांपेक्षा थोडा हळू आहे अशा मुलांकरता आहे.



माझ्या आईला ही शाळा चालू करावीशी का वाटली? माझी आई २००५ मधे जेंव्हा सुट्टीसाठी इथे आली तोपर्यंत माझ्या भावाचा मुलगा (यश) ६ वर्षांचा होता आणि त्याला बोलता येत नव्हते पण कळत सगळे होते. भारतात डॉक्टर्सनी त्याला मतीमंद असण्याची शक्यता सांगितली होती, पण आईला ते पटत नव्हते. तर तिच्या २००५ च्या अमेरिका भेटीत इकडे TV वर एकदा Autistic kids वर एक कार्यक्रम चालू असताना तिला यश मध्ये आणि कार्यक्रमातल्या मुला मध्ये बरेच साम्य वाटले, मग आम्ही लायेब्ररीत जाऊन पुस्तकं आणली आणि आईने बराच अभ्यास केला. भारतात परत गेल्यावर इकडे-तिकडे चौकशी केली पण कोणालाच Autism बद्दल माहिती नव्हती. मग तिने ठरवले की आपणच एक अशी शाळा काढायची.

२००६ मध्ये आईने आपले मेहुणे, हवाई दलातील निवृत्त अधिकारी श्री.जोशींच्या मदतीने, स्वखर्चाने 'संवेदना - स्वमग्न मुलांची शाळा' सुरु केली. शाळा non-profit आहे ,जिथे शिक्षकांना पगार मिळतो आणि board members मोफत- स्वयंसेवक म्हणून काम करतात. तिने मराठी वर्तमान पत्रां मध्ये पण Autism वर लेख लिहिण्यास सुरुवात केली आणि बघता बघता तिला जवळपासच्या खेडेगावातून अनेक पालकांचे फोन पण येवू लागले पण भांडवल कमी असल्या कारणाने तिला नाईलाजास्तव पालकांना नाही म्हणाव लागत. पहिल्या वर्षी जेमतेम १० मुले होती आणि त्यातील २-३ मुल रेग्युलर शाळेत पण जायची जिथे भरपूर अभ्यास असायचा त्यामुळे पालकांना वाटायचे ह्या शाळेतही शिक्षक त्यांचा अभ्यास करून घेणार. ज्यांना Autism बद्दल माहिती आहे त्यांना हे कळेल की ह्या मुलांचा मेंदू रेग्युलर मुलांसारखा काम करत नाही. पालकांना हे समजावण्यास बरेच दिवस लागले. अजूनही बऱ्याचशा पालकांन हे कळण्यास त्रास होतो.

आज शाळेत  चार ते सोळा वयोगटातील मुलांची संख्या पस्तीस आहे. संभाषण तज्ज्ञ, फिजिओथेरपिस्ट, मनोविकार तज्ज्ञ, अक्युपेशनल थेरपिस्ट अशी तज्ज्ञ मंडळी मदतीला आहेत. कांचनानेही (यशची आई) पत्राद्वारे व्यवसायाभिमुख शिक्षणाचा अभ्यासक्रम पूर्ण केला. ती मुलांना संगणक शिकवते व व्यावसायिक शिक्षणही देते.

इथे प्रत्येक मुलासाठी वेगळा अभ्यासक्रम असतो. प्रत्येकासाठी वेगळी उद्दिष्ट्ये, ध्येय असतात. मुख्य उद्द्येश म्हणजे त्यांना स्वावलंबी, शारीरिकरीत्या सक्षम बनवणे. बहुतेक मुलांमध्ये संभाषण क्षमता नसते,विचार करू शकत नाही. पण अपवाद म्हणता येईल तर तो आदित्यचा! तेरा वर्षाचा आदित्य सामान्य शाळेतून ह्या वर्षी इथे आला. तो संभाषण करू शकत असल्यामुळे त्याचं निदान लवकर झालं नाही. तो विचारलेल्या प्रश्नांना उत्तरं देतो; त्याचं पाठांतर चांगलं आहे, थोड्याफार प्रमाणात सामान्य ज्ञानही आहे. ह्या मुलांना आपल्या भावना व्यक्त करता येत नाही त्यांना समजून घेणे कठीण असते. कोणाचं कधी, कशावरून बिनसेल समजत नाही. त्यांची भाषा खूप विकसीत होऊ शकत नाही. वाक्य ही एका शब्दाचीच असावी लागतात. 'चल करूया' असे शिक्षिकेने म्हटले तर



मुलं गोंधळून जातात, चालायचं की करायचं हे त्यांना समजत नाही. तीच तीच गोष्ट अनेकवेळा करून घेतली की मात्र ती त्यांच्या डोक्यात इतकी फिट्ट बसते की मग त्यात ते चुका करत नाही. अचूकता ही एक त्यांना मिळालेली देणगीच आहे. मण्यांच्या माळा करायला मणी वाट्यांमध्ये क्रमाने लावून दिले तर उत्तम माळा बनवतात. माळा, कागदी पिशव्या, भेटकार्ड, लिफाफे अश्या काही वस्तू त्यांच्याकडून बनवून घेतात व त्या विक्रीस ठेवतात. जुजबी गणित शिकवतात. कॅलक्युलेटरवर एक अंकी, बेरीज, वजाबाकी शिकवतात. काही मुलं संगणक शिकू शकतात. यंत्रवत कामे उत्तम प्रकारे करू शकतात. झेरॉक्स काढण्यासारखी काही यंत्रवत कामे त्यांच्याकडून करून घेऊन काही प्रमाणात अर्थाजन करू शकतात पण अर्थात कोणाच्या तरी मदतीनेच. नाच, गाणेही, हस्तकला असे विषयही शिकवतात. वर्षातून एकदा जवळपासच्या ठिकाणी सहल काढतात पण त्यासाठी त्यांची मानसिक तयारी खूप आधीपासून करून घ्यावी लागते; तसेच वार्षिकोत्सवाची पण. नाच-गाण्यासाठी वेगळे कपडे घालायचे असल्यास त्यांना ते अनेकवेळा दाखवून, घालून, सांगून ठेवावं लागतं. त्यांची बदल स्वीकारायची तयारी नसते.





शाळेत प्रत्येक विद्यार्थ्याला त्याच्या समजुती नुसार शिक्षण दिल् जात. इथे वेगवेगळ्या स्तराचे विद्यार्थी आहेत, काहींना कमी प्रभाव आहे तर काहींना जास्त. कमी प्रभावाच्या मुलांना मग sensory and occupational therapy बरोबर रेग्युलर लिहिणं-वाचन पण घेतो. शाळेत वेगवेगळ्या स्तरांच्या विद्यार्थ्यासोबत वेगवेगळ्या वयाची पण मुलं आहेत. शाळेत विशिष्ट इयत्तांचे वर्ग असे नसतात उलट २-३ :१ अशी विद्यार्थी:शिक्षक विभागणी असते, त्यामुळे मुलांकडे जास्त लक्ष दिले जाते आणि त्यांची प्रगती चांगली होते.

Occupational Therapist मुलांना sensory आणि motor skills आणि इतर शारिरीक विकसनाला मदत करणारे व्यायाम करून घेतात.





चॅरिटी कमिशनरकडे किंवा समाज कल्याण खात्याकडे अनुदानासाठी अर्ज करावा म्हटलं तर नियम अन कायदेकानूनंच खूप असतात त्याची पूर्तता करायलाही पैसाच (टेबलाखालचा) लागतो, तो अव्वाच्या सव्वा मागतात तो आणायचा कुठून? अन दुसरे म्हणजे मुलांच्या चाचण्या घेऊन जिल्हा वैद्यकीय अधिकाऱ्याचं प्रमाणपत्र सादर

करावं लागतं त्यासाठी पालक तयार होत नाहीत. अनुदान मिळवण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. पालकांना त्यांच्या भविष्याची चिंता असणे स्वाभाविकच आहे त्यामुळे ते शिक्षणावर इतका पैसा खर्च करू इच्छित नाही.
आईच्या  भविष्याच्या खूप काही मोठ्या योजना नाहीयेत पण ह्याच शाळेला सुसज्ज, सर्व सोयींयुक्त बनवण्याची इच्छा आहे.

तिची ही  इच्छा पूर्ण करण्यात आपला सर्वांचा हातभार लागेल असा माझा विश्वास आहे.

www.sanmvedana.org

www.facebook.com/sanmvedana

**- सौ. दिपाली फडके खानझोडे, मंजुषा लागू**

# शाश्वती

असं विसरणं सोपं
असतं का कधी
तारा जुळतात सर्वच
जेव्हां तेव्हां तरी
मनाच्या उंब-यावर
मोठ्या आशांची
रांगोळी सजवलीय
आणि दाराला तोरणं
तुझ्या क्षितिजाची
हे इवलंसं जगच
माझं सर्वस्व
आणि तू
त्याचा अविभाज्य
बघ...
तुझ्यासाठी
इंद्रधनुही व्हायचीही
तयारी आहे माझी
फक्त त्याच्या रंगांची
शाश्वती मात्र....
तू व्हायचंस

**-अल्पना कशाळकर**



# पाऊस पहिला माझ्या मनातला

स्थळ : माझी सहाव्या मजल्यावरची स्वयंपाकघराची खिडकी
अचानक सरसर सरसर आवाज येऊ लागला.
अरे ...पाहिलं तर तो आला होता... त्यात ते FM वर लागलेलं...मनमोहना बडे झूठे...शेवटी चार दिवस चकवा देऊन मनमोहन पावसाच्या रुपात बरसू लागला...त्याला कसं आणि किती पाहू असं होऊन गेलं...आनंदाचे मोर मनात थुईथुई नाचू लागले...
जणू आज मी आयुष्यात प्रथमच पाऊस पहात होते... या खिडकीतून त्या खिडकीतून मोबाईलने दोनचार फोटो काढले...
असं वाटत होतं...द्यावं पोळपाट लाटणं एका बाजूला सारुन...आणि सर्व कामं भिरकावून...नवजात अर्भकाच्या आगमनाच्या उत्कट आनंदानुभवाप्रत... श्वासात...अंगअंगात याला भरुन घ्यावं...FM वर गाण्यांची बरसात...काली घटा छाये मोरा जिया तरसाये...
वृक्षतरुंनी पटापट अंगे धुऊन घेतली...त्यांचं उजळलेलं रुप पाहुन एका नवचैतन्याची सळसळ अवघ्या धुंदकुंद वातावरणात भरुन राहिली...
सारे पक्षी चुपचाप अंग चोरुन तरुंच्या कुशीत थरथरु लागले... त्यात त्याचं बरसणं सुरुच...
रस्त्यांवरच्या वाहनांचा वेग मंदावला होता...जणू पावसात भिजून ती गर्भार स्त्रीसारखी जड झाली होती..
मला मात्र राहून राहून उगीच वाटत होतं... अरे... याच्या या रुपाची इतक्या वर्षात आपण कधी दखलच घेतली नाही... किती विलक्षण आणि अद्भूत सारं...
काल मनाला आलेली मरगळ कधीच मरुन गेली होती... सारं कसं स्वच्छ निर्मळ... मनात पण चैतन्याची सळसळ सुरु झाली...
जणू चल विहार करायला आकाशात असं खुणावणारं... पंछी बनू उडके फिरु मस्त गगनमे...FM वर सुरु झालं होतं...

**-अल्पना कशाळकर**

पुस्तकाविषयी थोडेसे



# Sea of poppies written by Amitav Ghosh

Sea of poppies is the first of the Ibis trilogy. Ghosh has done a remarkable job of creating a character portrait of the main people in this epic saga. He has made good use of his background as an anthropologist to do extensive research on the natives and their perspectives. Ghosh weaves an intricate pattern of people together as jahaj- bhais and jahaj-behens. In the first part of the novel, Ghosh unfolds each of his main characters and by the time the voyage across the Indian Ocean starts the reader is intimately associated with them.

The story is set during the time of the opium wars. The novel starts with a glimpse into the life of Deeti -known to her kin as Kabutri-ki-ma- the main protagonist as she goes about her day to day business. She is shown as an exceptionally resourceful woman. Her life is full of strife and tribulations but she takes each challenge in her stride and plods on. She runs away with her lover Kalua to start a new life and her daughter is sent off to live with relatives. She is known as Bhauji - elder brother’s wife to everyone on the ship and is a source of support to all with her practical and steadfast frame of mind. She believes that this new life with Kalua is her rebirth, her escape from her previous karma.

On board the Ibis are:

Paulette Lambert an orphaned French girl who was brought up by her Indian wet nurse and she is more comfortable in saris than in 'memsahib' clothes. She looks upon the wet nurse's son — Jodu as her brother and is at ease conversing in the native tongue.

Raja Neel Rattan Halder who is wrongly convicted of forgery and is strangely able to make peace with his reduced station in life. He has known a life of material comfort and strict protocol with regard to his dietary habits and hygiene. This protocol is challenged to the core when he lives with his cell mate Ah Fatt- known as Aafaat (trouble) in the local

lingo- who is an opium addict. He is suffering from withdrawal symptoms and caked from head to toe in his own body waste. To maintain some semblance of hygiene in his cell Neel washed the opium convict clean as if washing away his own fetishes.

Zachary Reid starts his journey as a carpenter on this ship but makes his way up as the second mate.

The team of lascars is described in detail highlighting each lascar's unique traits — right from the alternate self Ghaseeti begum of one of the lascars. Ghaseeti begum would typically make an appearance when all the officers were out on the shore and the lascars would entertain themselves with her lively dance performances.

Baboo Nob Kissin is the supercargo and he is undergoing a transgender transformation based on a religious epiphany

The girmitiyas — the coolies on the ship who are being transported to farms in Mauritius, their dreams, their aspirations, hopes and fears are described with great sensitivity. They all experience the fearsome thought that they would never set foot on land again.

The British in this novel are shown as caricatures with a very predictable mind frame of exploitation of the natives. They even defend their opium selling in China as a service to god by propagating free trade.

The novel is generously peppered with native language and since I could actually understand the terms it enhanced my reading experience but it would be interesting to see how a reader would feel for whom these terms are incomprehensible. I assume that they would grow on the reader and one would correctly guess the meaning without having to refer to the dictionary. Just as a child one expands ones vocabulary by reading and not by looking in the dictionary.

Ghosh has done a wonderful job of transporting the reader back to the times when the opium wars were in the air. The food, customs, the mannerisms and the thought process of the people who lived in those times are vividly described. There are some very humorous scenes in the novel — the dinner scene where Neel entertains his British guests in a formal dining room that was not in use for years is truly comic. Neel recoils in horror to see that his servants have substituted an old chamber pot as a centerpiece and vase! Neel is unable to eat with the foreigners as he does not want to lose caste and watches forlornly as his guests devour one scrumptious dish after another. The book is entertaining and the reader's curiosity is piqued right up to the end. The ending is apt —keeping in mind that a sequel for

this book is soon to follow. Ghosh is able to portray these characters from an ancient time quite realistically. The only drawback in this novel is that sometimes the digressions from the main plot tend to meander for quite a while. Nevertheless he manages to whet the reader's appetite for the continuation of the story in the next of the series — 'The River of Smoke.'

-जुई नवरे



# अभ्यंग

अभ्यंगाचा अर्थ आहे पूर्ण शरीराला तेल लावणे. स्वस्थ व्यक्तीला आजार होऊ नयेत यासाठी बल टिकून राहण्यासाठी अभ्यंग हा उत्तम उपाय आहे.
अभ्यंग देताना व्यक्तीची प्रकृती, ऋतू, देश तसेच त्याला असणारे व्याधी यांचा विचार केला जातो. शरीराच्या तेल मर्दाची प्रशंसा करताना चरक सूत्र स्थानात खूप छान उदाहरण देतात. त्याचप्रमाणे गाड्यांच्या चाकांच्या axis मध्ये तेल सोडल्याने गाडी कार्यक्षम होते, बिजागऱ्या मध्ये तेल सोडल्याने दरवाजे, खिडक्यांचे सांधे सहजपणे उघडता बंद करता येतात. अगदी त्याचप्रमाणे आपल शरीरं हे ही एक चालत बोलत यंत्रच तर आहे. त्याला सुख पूर्वक तेलादीचे मर्दन केलं तर स्नेहन ( अंगाला तेल तूप आदी लावणे ) त्वचा दृढ आणि सुंदर होते. शरीराला वाताचे विकार सहजासहजी होत नाही. शरीराला क्लेश सहन करणे अथवा व्यायाम करण्याची ताकद येते. अभ्यंगाचा फार सुंदर विधी वर्णन केलेला आहे. सात पायऱ्या मध्ये अभ्यंग केला जातो. यामुळे विविध मांसपेशी कार्यरत होण्यास मदत होते. अभ्यंग करताना कोणत्या तापमानाचा स्नेह वापरावा हे ही महत्वाचे आहे.
जसे डोक्यावर थंड किंवा सुखोष्ण तेल वापरणे. कारण डोक हे प्रधान (मुख्य) मर्म स्थान आहे त्याला उष्ण पासून वाचवणे महत्वाचे आहे.
म्हणून तर आपण उन्हाळ्यात डोक्यावर टोपी किंवा घाटावर मुंडासे वापरण्याची पद्धत आहे किंवा तीव्र उन्हाळा जेथे असतो त्याठिकाणी एरंडाच्या पानावर तेल घालून ते टाळूवर ठेवून वर टोपी घातली जाते. ते उष्म्याच्या त्रासापासून वाचण्यासाठीच.
हातापायाना स्नेहासाठी शीतकाळात उष्ण व उष्णकाळात थंड स्नेह वापरण्याची पद्धत आहे. ह्या सगळ्या बरोबर कर्णपूरण म्हणजे कानात किंचित उष्ण तेल घालणे हे ही महत्वाचे आहे.
अभ्यंग करताना अवयवांच्या लांबी व आकाराप्रमाणे जोर व गतीमध्ये फरक करावा लागतो. कारण अभ्यंगाचा मुख्य उद्देश आहे मांसपेशी मधील कार्यक्षमता वाढविणे. अवयवांच्या नाजुकतेचा, त्यांच्या स्थानांचा, लांबी रुंदीचा विचार न करता स्नेह लावला गेला तर त्याचा मूळ उद्देश नाहीसा होऊन उलट शरीराला त्रासच होईल जस की बाळंतिणीना तेल लावायला येणाऱ्या स्त्रिया खूप जोराजोरात रगडून तेल लावतात. ज्यामुळे बिचारी आधीच वेणा देऊन थकलेली असते .त्यात तिचा थकवा अधिक च वाढतो. अगदी नेमकेच सांगातचे तर दुखणार्या पायाना पावलापासून वर गुढघ्यापर्यंत अशा तऱ्हेने तेल लावले जाते ते चुकीचे आहे. तेल लावण्याची गती ही वरून खाली म्हणजे गुढघ्यापासून सुरवात करून खाली तळपायांत अशीच असायला हवी. याला अनुलोम पद्धती म्हणतात लोम म्हणजे केस. केसाच्या दिशेने केलेले असा याचा अर्थ आहे.
प्रत्येक अवयवाला किती काळ मर्दन करायचे ? (1मात्रा --5 सेकंद)
300 मात्रा पर्यंत अभ्यंग त्वचेतील रोमात जाते.

400 मात्रा -- त्वचे पर्यंत जाते
500 मात्रा -- रक्तापर्यंत पोचते
600 मात्रा -- मांसापर्यंत पोचते
700 मात्रा -- मेदापर्यंत पोचते
800 मात्रा -- आस्थि पर्यंत पोचते
900 मात्रा -- मज्जे पर्यंत पोचते

ह्या प्रमाणे एका अवयवाला साधारण पणे पाच मिनिटे असे मानल्यास संपूर्ण अभ्यंगाला 15 ते30 मिनिटे लागतात. आजारा प्रमाणे कालावधी थोड्याफार प्रमाणात मागे पुढे होऊ शकतो.

आता आपण अभ्यंगा मूळे होणारे मुख्य फायदे बघु या.

1-वार्धक्य दूर ठेवता येते.
2- श्रम दूर होतात.
3- वात कमी होतो.
4 - नेत्रांची क्षमता वाढते.
5- धातुपुष्टी येते.
6-झोप चांगली लागते.
7-त्वचा कोमल व दृढ होते.
8- कष्ट सहन करण्याची ताकद येते.
9- नित्य अभ्यंग करणाऱ्या ना काही कारणाने लागला तरी फारसा त्रास होत नाही.
10- अभ्यंगाने त्वचा, बुद्धी,चांगली होते. शरीर सुदृढ व कांती निकोप होते.

माणसाचे जीवन आजकाल खूपच गतीमान आहे. सगळीच जण कामात व्यस्त असतात. त्यामुळे रोज एवढा वेळ अभ्यंगाला देणे शक्य असेल अस नाही. पण कामाचा रेटा पुढे न्यायचा असेल तर किमानपक्षी महिन्यातून एकदा तरी अभ्यंग  जरूर  करून घ्यावे.

संपूर्ण अभ्यंगा ऐवजी पादाभ्यंग, फक्त पायाना अभ्यंग  करवून घेणे यामुळेही 50 टक्के फायदा शरीरिला मिळू शकतात.

शरीराचा बराचसा भार आपली पावले सोसत असतात. शब्दशः पायावर उभे राहण्यासाठी  आपल्या पावलांची ताकद जोखून ती वाढवता आली पाहिजे. पायांना साबण न लावता ऊष्ण पाण्याने औषधी काढ्याने स्वच्छ केले जाते व अवयवांच्या आवश्यकते प्रमाणे गुढघ्या पासून तळ पावला पर्यंत सुखपूर्वक  स्नेहन केले जाते. ह्यानंतर पुन्हा औषधी काढ्यानी पाय धुवून चूर्णाने सावकाश घासून पाय ऊष्ण पाण्याने स्वच्छ केले जातात .

पादाभ्यांगा मुळे पावलांचा खरखरीत पणा, भेगा नाहीशा  होतात. पायांचा थकवा जातो. पादाभ्यांगामुळे सहसा sciatica चा त्रास होत नाही.

पायांच्या शिरा व स्नायूसंकोच कमी होतो.

पाय मऊ कोमल पण बलवान होतात. दृष्टीला फायदा होतो. Diabetes असणाऱ्यानी तर पावलाची काळजी घेणे खूपच महत्वाचे असते.

**-डॉ. शर्वाणी कुळकर्णी**

# तो न मी

सायंकाळी निवांत वेळ मिळाला ....खिडकीमध्ये मस्त आल्याचा वाफाळलेला चहा घेऊन बसले होते .... आभाळ भरून आले होते ...मस्त वातावरण झालेले ...इतक्यात तो आला ...खूप दिवसांनी भेटला इतका निवांत ..त्याला बघून मन भरून आले ..त्याला म्हणल खूप दिवसात गप्पा नाही झाल्या रे आपल्या ....बोलयचं तुझ्याशी खूप काही ....

तो: खरेच खूप दिवस झाले तुला भेटून ...आज खूप गप्पा मारू आपण !!!

मी: राहू दे रे आता हो म्हणशील आणि नंतर हळूच जाशील कळणार पण नाही मला .... तो: नाही जाणर आहे आता मी इथेच आहे ४ महिने तरी ....

मी: तुझ्याशी बोलले की खूप हलके वाटते ...मनावरचा भार उतरल्यासारखे वाटते .... तो: माहित आहे ग मला ...तू काय नाविन आहेस का मला ?? किती वर्षापासूनची आपली ओळख ??? हसरी खोडकर, हळवी तू

मी: हो रे तुझ्याशी बोलताना माझ्या डोळ्यातल्या पाण्याला पण अलगदच सामावून घेतोस कुणाच्याही नकळत ...तुझ्या प्रेमाच्या तुषारांनी मला कुशीत घेतोस ....

तो: कुणा जवळ तरी बोलावे आपले मन हलके करावे ग .... मी: सगळेच सगळ्यानबरोबर बोलता येत असे नाही होत रे ...कुणाचे तरी रुसवे फुगवे त्यापेक्षा आपण आपल्य्तच छान नाही का ? तो: मला हे माहितच आहे म्हणूनच येतो तुला भेटायला ....तुझ्याशी गुज गोष्टी करायला .... मी: तू आलास की छान वाटते ...तुझ्याशी बोलताना कोणतीही नाती, मान-अपमान आड येत नाहीत ...अगदी मोकळेपणाने बोलता येते ..कोणताही किंतु न ठेवता ....तुझ्या वर्षावाने हिरवी गार झालेली ही सृष्टी मला बोलते करते ....तू मला न दुखवता सगळ ऐकून घेतो .मला समजून घेतो ...अगदी अलगद खुलते मी तुझ्या सहवासात ...कधी आई बनून तर कधी मित्र बनून मला कुशीत घेतोस .....तुझ्या प्रत्येक थेंबाचा स्पर्श मला माझीच नवीन ओळख करून देतो ....तुझ्या वर्षावाने अगदी सूर्य प्रकाश सारखे स्वच्छ न सुंदर, निर्मल दिसते ... ...तू आलास की अगदी हलके हलके वाटते ... तो जोरात हसला ...खिडकीतल्या माझ्यावर त्याचे तुषार अलगद उडवले आणि म्हणाला ...वेडे मन मोकळ करत जा ...स्वच्छंदी फुलपाखरासारखे जगावं ....स्वतच्या कोशात जास्त अडकवून ठेवू नये स्वतःला ..

**-श्वेताली कुलकर्णी**



-प्रसाद आठल्ये



# चंदेरी दुनियेत : फिल्मी फेरफटका

## Bells & Whistle

इंग्रजीत एक छान शब्द प्रयोग आहे : Bells & Whistles. सध्याच्या यंत्र युगात आपण जगतो ते smart technology च्या अत्याधुनिक यंत्रांच्या सहाय्याने. मग ती आधुनिक कार असेल, किंवा smart phone , कॉम्पुटर , TV आणि कितीतरी यंत्र असू शकतील. आपल आयुष्यच अलीकडच्या या आधुनिक यंत्रांनी घेरलेल आहे. त्या यंत्रांच्या विविध आकर्षक पैलूंना इंग्रजीत Bells & Whistles म्हणतात. उदा. आपण एखाद्या कारच्या संदर्भात म्हणतो की This car has many bells & whistles. तेव्हा त्यातील luxury features च्या संदर्भात आपण बोलत असतो . त्याचा कारच्या मुलभूत यंत्रणेशी काही संबंध नसतो. पण त्यांच्या अस्तित्वामुळे कार चालकाला अतिरिक्त फायदे किंवा सुखसोयी उपलब्ध होतात.

परंतु जेव्हा हिंदी सिनेसंगीतात Bells & Whistles म्हणजे " घंटा आणि शिट्टी " या शब्दांचा वापर करतो तेव्हा तो गाण्यांचा एक अमुलाग्र भाग असतो. गाण्यांच्या संगीताशी हे दोन्ही नैसर्गिक "नाद" किंवा आवाज एकरूप झालेले असतात आणि गाण्याला एक वेगळच माधुर्य देतात. आजवरच्या सिनेसंगीतात वेगवेगळ्या घंटांचा आवाज संगीतकारांनी वेळोवेळी चाली लावताना केलेला आहे. तसेच ओठांचा चंबू करून जिभेच्या सहाय्याने वारा सोडून जी सुरेल ध्वनिलहरी आपण निर्माण करतो आणि आपण ज्याला शिट्टी म्हणतो तिचा सुद्धा संगीतकारांनी त्यांच्या गाण्यांमधून खुबीने वापर केला आहे. एवढेच नव्हे तर ती गाणी त्या गाण्यातील त्यांच्या अस्तित्वामुळे कर्णमधुर झाली आहेत. त्याचाच परामर्श या फेरफटक्यात मी आज घेणार आहे.

सिनेमातील गाण्यांच्या चित्रीकरणातील प्रसंगानुरूप विविध घंटांचा उपयोग संगीतकारांनी केलेला आहे. त्यामुळे गाण्याचीच नव्हे तर त्या प्रसंगाची सुद्धा लज्जत वाढते. सिनेमात पेरलेली गाणी ही एखाद्या घटनेचं किंवा प्रसंगांच वर्णन करण्यासाठी किंवा मनातल्या भावना व्यक्त करण्यासाठी घातलेली असतात आणि ती जेव्हा रसिक प्रेक्षकांच्या मनाला जाऊन भिडतात तेव्हा लोकप्रिय होतात. (मी अर्थात जुन्या चित्रपट गीतांविषयी बोलतोय, अलीकडच्या असंबद्ध item songs विषयी नाही )



### सायकलची घंटा

सायकलवरून जाताना हिरो हिरोइन जी गाणी म्हणतात त्यात तिचा वापर केला जातो. त्याची शेकडो उदाहरणे आपल्याला देता येतील. वानगीदाखल एस. डी. चे “तेरे मेरे सपने “मधील "हा मैने कसम ली" किंवा R. D. चे पडोसन मधील "मै चली, मै चली… "

## बैलांच्या गळ्यातील घंटा

त्यानंतर घंटेचा दुसरा प्रकार म्हणजे बैलांच्या गळ्यातील घंटा, किंवा घुंगुरमाळा. त्यांचा घंटानाद खेडेगावातील दृश्याच्या, किंवा शेतकरी शेतात काम करण्याच्या गाण्यांमध्ये अत्यंत प्रभावीपणे केलेला दिसतो. सलीलदांच  आनंद मधील " कहीं दूर जब दिन ढल जाये " किंवा देशभक्तीपर गाजलेल्या मनोजकुमारांच्या "उपकार" मधील "मेरे देशकी धरती सोना उगले … " ही उत्तम उदाहरण आहेत.




अस म्हणतात की  उपकार चित्रपटातील हे गीत बनवताना संगीतकार कल्याणजी आनंदजींनी २४ तासाहून अधिक तास त्यावर काम केले होते. या गाण्यात पक्ष्यांचा किलबिलाट, गावातील स्त्रियांचं नदीवर पाणी भरणे, ओढ्याच्या पाण्याच्या खळखळाट, शेतकऱ्यांची शेतातील बी पेरणी आणि बैलांच्या गळ्यातील घंटांचा घंटानाद, अत्यंत प्रभावीपणे दाखवला आहे.

## मंदिरातील घंटा



तिसरा घंटेचा प्रकार म्हणजे मंदिरातील घंटा ; किती वेगवेळ्या आकाराच्या त्या घंटा , वेगवेगळ्या पट्टीतून निर्माण होणारे ते घंटानाद. एका पवित्र वातावरणाची, ईश्वराच्या अस्तित्वाची साक्ष देणारी ती खूण. उदाहरण द्यायचं झाल तर Johny mera naam मधील कल्याणजी आनंद्जींच "मोसे मेरा शाम रुठा " किंवा "सत्यम शिवम सुंदरम " मधील लक्ष्मि-प्यारेंच शिर्षक गीत. पण घंटेचा उपयोग, माणसाच्या मनातील विचारांच्या कोलाहालाच  प्रतिक  म्हणून कल्पकतेने वापरणारे मदनमोहन विरळाच . यांनी चित्रपट संजोग मधील "भूली हुई यादो" (https://www.youtube.com/watch?v=dzu4VKQ7nAE)  मध्ये  गाण्याच्या सुरवातीला केलेला  घंटानादाचा उपयोग  आणि त्यानंतर कोलाहाल मिटून विचारांचं स्थैर्य दर्शवणारा ग्रुप violin चा उपयोग  जरूर तो परिणाम साध्य करतो.

## घुंगरू

शेवटचा घंटेचा प्रकार म्हणजे घुंगरू. अनेक लहान घंटांची माळा. घुंगरू म्हटले की आठवतात हिंदी सिनेमातली मुजरा गीते आणि मराठीतील लावण्या. लावणी म्हटली की पहिलं नाव ओठावर येत ते "सांगते ऐका" मधली "बुगडी" च. लावण्यांची शिरोमणी. त्या घुंगरांना जेव्हा साथ मिळते ढोलकीच्या थापेची आणि झांजांच्या किणकीणाटांची तेव्हा रसिकांकडून शिट्या आणि टाळ्यांची अनाहूतपणे बरसात होते आणि मुजरागीते म्हटली की आठवतात "मुगले आजम ", "उमरावजान ", "पाकीझा" आणि कितीतरी हिंदी चित्रपट.




मला आवडणार आणखी एक गीत म्हणजे O.P. नय्यर यांच्या "फागुन" मधील "छम छम घुंगरू बोले" (https://www.youtube.com/watch?v=_PHJYe-Ui_A) येथे नमूद करावेसे वाटते.

## शिट्टी



आता शिट्टी कडे वळूया. आपण विरंगुळ्यासाठी शिट्टी वाजवून गाणी म्हणतो आणि स्वत: ची करमणूक करतो. शिट्टी हे मानव मिर्मित अनादिकालापासून चालत आलेले एक "फूंकर वाद्य". शिट्टीचा संबंध आनंद, बेफिकीरपणा, याच्याशी जोडला जातो. संगीतकारांनी वेळोवेळी शिट्टीचा उपयोग आपल्या गाण्यांमधून केलेला आहे. काही गाणी शिट्टी मुळेच जास्त लोकप्रिय झाली आहेत. शिट्टी असलेली गाणी म्हटल कि ढीगभर गाणी आठवतात . पण लेखाची मर्यादा लक्षात घेता सगळी येथे देत नाही . पण लोकप्रिय गीतांपैकी काही देता येतील . उदा. "हम है राही प्यारके" (नौ दो ग्यारह), "नखरेवली "(New Delhi), "किसीकी मुस्कुराहटोपे" (अनाडी).
शिट्टी हि बहुदा आनंदाच प्रतिक मानल जात असल तरी एका गाण्यात हेमंतकुमारांनी त्याचा उपयोग विलक्षण "haunting effect" साठी केला आहे आणि ते गाण म्हणजे खामोशी सिनेमातलं "तुम पुकारलो" जरूर ऐकून पहा.
दुसरी शिट्टी म्हणजे जुन्या locomotive steam engine ची. लहान मुलांची छूक छूक  गाडी. गाण  लक्षात आलच असेल. आशाजींनी गायलेले आपल्या बालपणातल आवडत गाण म्हणजे धुरांच्या रेषा हवेत काढणारी " झुक झुक झुक झुक आगीनगाडी ".

हिंदी चित्रपटातून सुद्धा त्याचा फार छान उपयोग केलेला काही गाण्यांमध्ये आढळतो. लक्ष्मिकान्त प्यारेलाल यांच फिल्म "दोस्त" मधील " गाडी बुला रही है " किंवा R.D. बर्मन यांच्या “अजनबी” मधल "हम दोनो दो प्रेमी " ही त्यातली वानगी दाखल देता येतील. रस्ता बांधकामाच्या रोड रोलर च्या शिट्टीचा आवाज असलेल “Warrant”  सिनेमातलं "रुक रुक रुक रुक जाना " हे गाण  एक वेगळाच ठेका देऊन जात .



शेवटी, हिंदी चित्रपट सृष्टीत इतिहास घडविणाऱ्या "शोले" चित्रपटातील R.D. च्या अतिशय लोकप्रिय गाण्याने ह्या लेखाचा शेवट करतो. यात सायकलीची शिट्टी, घोड्यांच्या टापा, आणि गाडीची शिट्टी या तीन आवाजांचा त्रिवेणी संगम आहे. ते गाण म्हणजे "कोई हसीना जब रूठ जाती है तो "
(https://www.youtube.com/watch?v=ndgxsseqE-I) जरूर हे गाण ऐका. R.D. बर्मन अर्थात "पंचम" यांच्या कुशाग्र बुद्धिमत्तेला सलाम करून हा लेख संपवतो.

आता आपली भेट पुढील अनुबंधच्या अंकातील "चंदेरी दुनियेच्या फिल्मी फेरफटक्यात.

**- श्रीनिवास जांभेकर**



# मितवा सिनेमा-Review

श्री. सिने-निर्माता त्याच्या office मधे येरझारा घालत अचानक secretary ला म्हणतो, “भन्नाट! अप्रतीम!”

ती लाजल्याचा आव आणत: “काय?”

निर्माता: “अगं भन्नाट कल्पना सुचलिये आपल्या पुढच्या सिनेमा साठी, सगळ्यान्ना बोलावून आण brainstorming session आहे म्हणावं.”

ती लगबगीने जाते. काही वेळात सगळे office मधे आपापली notepads, laptops घेवून तैयार नवीन कल्पना ऐकायला.

निर्माता: “आले सगळे. Great. तर ऐका. आपल्याला मराठी मधे पण KJo SRK type सिनेमा बनवायचाय. Romantic तर पाहिजेच. पण करण जोहर शाहरुख च्या सिनेमा ची intensity आणि मुख्य म्हणजे तितका hit पाहिजे. अस काही ते English मधे म्हणतात ना Stew ते बनवायचंय की hit झालंच पाहीजे.”

Staff 1: Stew कशाला sir, आमटी म्हणुया की, अगदी चिंच-गुळाची.

Staff 2: आमटी? Lunch time ला वेळ आहे तर आत्ताच भूक लागली बघ.

निर्माता : हे final झालं की बिर्याणीच मागवूया. पण आत्ता ह्या सिनेमा कडे वळूया? Secretary! Take notes. Once in a lifetime movie आहे हा. This is big. तर आपल्या ह्या आमटीत पहिला ingredient काय असला पाहिजे बरं?

Staff 1: आता SRK चा सिनेमा म्हणजे आधी SRK पाहीजे.

निर्माता : बरोबर. कोण बरं होउ शकेल आपला मराठी SRK?

श्रेयस तळपदे? Not romantic enough. Nope.

अनिकेत विश्वासराव? Chocolaty - Aamir Khanish.

अंकुश चौधरी? Nah…Akshay Kumarish.

Secretary: Sir! स्वप्नील जोशी, कित्ती romantic आहे तो, आणि कसला गोड आहे.

निर्माता : Perfect. क्या बात है। स्वप्नील।।।आपला कृष्ण, सगळ्या गोपिका..I mean …मुली वेड्या होतील. मस्त!

Staff 1: चालेल. तसा flirty वागणं आहे त्याचं, English भारी बोलतो आणि दिसतो पण modern. NRI लोकान्ना पण आवडेल.

Staff 2: ते ठीक आहे, पण अहो तो बोलत नाही बरोबर. 'स' चा उच्चार 'ष' सारखा काहीतरी करतो. तोंडात लिमलेट ची गोळी ठेवलिये नाहीतर जिभेला फोड आलाय असं वाटतं.

Secretary: मग त्यात काय झालं? शाहरुख नाही का डर मधे क.. क.. क.. किरन करुन हिट झाला?

निर्माता : अगदी बरोबर. तर take note of that. स्वप्नील जोशी आपला हीरो. ठरलं. आता heroine चं ठरवूा

Staff 2: मुक्ता बर्वे. स्वप्नील - मुक्ता ही जोडी काही SRK Kajol पेक्षा कमी नाही…हिट जोडी आहे.

निर्माता : चालणार नाही. Heroine चे डोळे घारेच हवे.

Staff 2: ही काय अट आहे?

निर्माता:  काजोल - रानी type वाटली पाहिजे, तरच तो feel येतो SRK Karan Johar movie चा.

Staff 1: आहे एक नवीन heroine मस्त घारी-गोरी. सोनाली कुलकर्णी, ती दिल चाहता है मधली नव्हे, नवीन आहे, माझ्या फोनमधे फोटो दाखवतो, १ मिनिट.

निर्माता: (फोटो पाहून) आयला, मस्त आहे रे!

Staff 2: हां पण चेहर्यावर innocence असा नाही आहे.

निर्माता: काय करायचा innocence? हीच मस्त आहे, करुन टाकू final. जास्त विचार नको करुया. आता आणखी एक heroine पाहीजे, राणी मुखर्जी type. एक काम करुया स्वप्नीललाच सांगूया तू select कर दुसरी heroine. SRK नी नाही का नवीन heroines ना chance दिला, दिपीका आणि ती कोहली ची girlfriend, कोण ती, हां अनुश्का शर्मा. अशी काहितरी हवा बनवूया, की एका मोठ्या project साठी नवीन मुलगी हवी आहे, आणि स्वप्नील स्वत: निवड करणार आहे. सिनेमा चं shooting सुरु होण्या आधीच हवा बनेल.

Staff 1: Great idea sir. What else?

Staff 2: बरंच काही. Helicopter, posh गाड्या…K3G मधल्या सारखं, आणि hero गडगंज श्रीमंत असला पाहीजे, mansion मधे राहणारा. नाहीतर NRI लोक पाहणार नाहीत. कसं जमवणार सगळं?

निर्माता: आत्ता कसं बोललाता। झालंच म्हणून समजा. Helicopter घेऊ भाड्याने, आणि mansion कशाला पाहिजे? कायम 5 star होटेल मधे राहील आपला हिरो. त्याला 5 star होटेल चा मालकंच बनवू, प्रश्नच मिटला, काय?

Staff 2: ठीक आहे, पण style चं काय? srk चे कैसे बोलणे srk चे कैसे चालणे… जमणार आहे का?

निर्माता: न जमायला काय झालं. कोणीही करेल. स्वप्नील तर समर्थच आहे. आणखी काय ingredient पाहिजे? बोला पटापट.

Staff 1: “Tragedy.” कल हो ना हो, कुछ कुछ होता है type.. कुणाच्या तरी मरणा वरुन tragedy.

निर्माता: Okay. पण आपले main कलाकार नको मारुयात, heroine चा नवरा दाखवू, flashback मधे accident. Actually, dead पेक्षा almost dead जास्त tragic वाटेल का? In fact, नवरा पण almost करुयात. आपल्या heroine चा almost-नवरा almost-dead …coma मधे. ती आणि तिचे mysterious घारे डोळे… त्यात अगदी दर्द वगेरे.. Hero ला प्रेमात पडण्यावाचून optionच नाही आणि अर्थात, ती दुसरी मुलगी आपल्या हीरो च्या प्रेमात आहे.

Staff 1: sir तिला अनाथ दाखवूया, आश्रमात वाढलेली वगेरे, direct प्रेक्षकांच्या काळजालाच हात.

निर्माता : अर्रे…Genius! तर आपला हीरो ह्या अनाथ मुलीच्या प्रेमात पडतो, पण तो almost-dead almost-नवरा हा अडथळा त्यांच्यात. आता प्रेक्षकांत उत्सुकता.. त्यांचं कसं जमायचं…आहे की नाही ‘हटके?’ काय आमटी होत्ये बघा, घमघमाट सुटलाय.

Staff 1: एक थोडा modern touch देउया का? Live-in relation वगेरे? बघा म्हणजे, young crowd ला आवडेल.

Staff 2: हो? मग old crowd चं काय? त्यांच्या साठी old touch पण द्यायचा का आता? काकस्पर्श type?

निर्माता : सही। इतक्या वेळात पहिला solid input दिलास बघ। एकदम sixer मारलास. काकस्पर्श। Perfect! कावळा पिंडाला शिवण्यावरुन काही drama दाखवता येईल. तिच्या almost-dead नवर्याला नाहीतरी मारायचं आहेच.

कोपर्यात बसून सगळं ऐकणारे Accountant म्हणाले, modern touch द्यायचाय तर एक बेडरुम सीन पण टाका की!

सगळे अवाक…निर्माता : काय काका सुचतंय तुम्हाला ह्या वयात! SRK च्या सिनेमात नसतय तसलं काही. हां पण एक दमदार किसिंग सीन टाकू..तब्बल १ ते २ मिनिटाचा, फालतु २ सेकंद नाही. पब्लीक खूश!

Secretary: कुछ कुछ होता है सारखी एक लहान मुलगी आणि flashback जमेल का?

निर्माता : जमवू की, कुठेतरी adjust होइल.

Staff 1: “Twists”… हल्ली twist शिवाय सिनेमा होत नाही. आणि memory loss. हल्ली सगळ्या serial मधे असतो, आवडतं लोकांना।

निर्माता : अगदी अगदी. भरपूर twists टाकू, अगदी प्रेक्षकांचं आतडं पिळवटेल इतके टाकू. Memory loss चं पण जमवू.

Staff 1: SRK म्हणजे रोमान्स पाहीजेच, नाहीतर female audience फिरकणार नाही.

निर्माता : प्रश्नच नाही! स्वप्नील पट्ठ्या त्यात expert आ

हेच. बाकी बराच gut-wrenching, nauseating रोमांस टाकूच. अगदी विमानाने आकाशात 'I love you' लिहीणे वगेरे बरच काही.

So let's recap. काय काय झालं? SRK, घार्या डोळ्यांची हिरोईन, twists - कमीत कमी चार, पराकोटीची श्रीमंती, हेलिकौप्टर, posh गाड्या, foreign tour, इंग्लिशचा भरपूर वापर, हाय क्लास लाइफ…थोडे भारी dialogue टाकुयात. आत्ता मला सुचला एक- “आज मला समुद्राचा हेवा वाटतो, कारण त्याची नदी त्याला कधी सोडून जात नाही” कसा वाटला?

Staff 1: मस्त

Staff 2: काही फारसा अर्थ लागला नाही, मजा नाही.

निर्माता: अर्थ कशाला लागायला पाहिजे? काहीतरी philosophical type बोललं म्हणजे झालं. स्वप्नील मस्त डोळ्यात पाणी-बिणी आणून full emotion सकट म्हणेल. आवडेल पब्लिक ला.

Secretary: गाणी?

निर्माता : हो खरं। गाणी राहिलीच की. तो होणार सून…चा संगीतकार छान आहे, त्याला घेऊ जमल्यास एखादा हिंदीतला संगीतकार पण घेऊ. गाणी १-२ तरी हीट झालीच पाहिजेत. झालं तर मग, चला कामाला लागा.

Staff 2: Sir अहो, Story?

निर्माता : Story? झाली की, इतका वेळ काय बोलतोय आपण?

Secretary तिच्या notes पाहत: नाही sir, कुठाय story?

निर्माता: कमाल करता तुम्ही लोक. हे सगळे ingredients एकत्र केले की काहीतरी story रुपी तयार होईलच ना. पुरे झालं. आणि मला सांगा, इथे महत्त्वाचं काय आहे? मराठीत SRK KJo type cult आणणे!cकसली story घेऊन बसले राव तुम्ही?

Staff 2: बरं title?

निर्माता : हां ते पाहिजेच. SRK च्या एखाद्या सिनेमा चं गाणं घेऊ आणि title बनवू. ती पण style आहे…म्हणजे बघा…'दिलवाले दुल्हनिया ले जायेंगे'…परत, 'जब तक है जान'…

Staff 1: ये काली काली आंखें?

निर्माता: अरे राजा, आपली heroin घारी आहे, त्यात काजोल पण घारीच होती म्हणा. पण नको ते.

Secretary: “मितवा” कसं वाटतं?

निर्माता: Perfect. अगदी SRK डोळ्यासमोर आला. Foreign मधे बाहें खोलके पटांगणात उभा राहिलेला. सिनेमा १००% हिट होतो की नाही बघा. सगळं final करा, मी आलोच स्वप्नील ला फोन करुन.

**-प्राजक्ता आठल्ये**



**-केदार कोल्हटकर**



# LIFE

Some people might think life is a collection of years mixed with good and bad. That is not true because life is so much more. Life is a car, and hard work is the fuel. Everyone has to pay at the pump sometime, whether it's now or later, and for those who walk they have the toughest lives of all. The hands steering the wheel are creativity and knowledge, and life is more under control when both hands are on the wheel. The foot pressing the gas pedal is passion, and where there is passion you will zoom through. Everyone has to turn on that radio sometime and face the music, whether it's happy or sad that's the music of our lives and we must face it. Lastly the headlights are our parents. They are the ones that guide us, and show us the way. When we leave our parent's home the sun comes up and it is time to turn off those lights. This is also when life truly starts, when we see the world through our own eyes. Life will just go on until you park in the garage of heaven.

-वेद ढोले



# ओंजळीतील फुले.......

सर्व दूर पसरलेली हिरवळ आणि त्यावर पसरलेले उन पाहून श्रावण सुरु झाल्याची चाहूल लागते. श्रावण सुरु झाला की कोकणात सणा वारांची रेलचेल चालू होते. सुरवातच होते ती 'दिव्यांच्या अवसेने'. घरातले जुने पितळी, चांदीचे  दिवे घासून पुसून लख्ख करून त्यांची संध्याकाळी साग्रसंगीत पूजा करून त्यांना 'उकडीच्या फळांचा' नैवेद्य दखवला जातो. त्यानंतर येतो तो श्रावणातला पहिला सण 'नागपंचमीचा'. पंचमीच्या आदल्याच दिवशी 'गोमेटा' नावाने मिळणाऱ्या  वेलाची गुंडाळी नागोबाला पूजताना वाहण्यासाठी म्हणून आणतात. पण ती घरात न आणता घराच्या दर्शनी भागात-ओटीवर खुंटीला टांगून ठेवलि जाते. मुंबईला असताना लाह्या विकत आणायचो. इथे श्रीवर्धनला मात्र घरीच वेगवेगळ्या धान्यांच्या लाह्या फुलवल्या जातात.

गावातल्या शाळा दर श्रावणी सोमवार व शनिवारी लवकर सुटतात. अजूनही प्रत्येक घरी सोमवार-शनिवार चे उपवास असतात. त्यादिवशी अगदी दुपारी चार पावजाल्यापासुंच घराघरांतून 'बिरड्याच्या' आमटीचा घमघमाट येत असतो. श्रावणात गावामध्ये प्रत्येकाकडे उपवास सोडायला 'बिरड्याची (कडवे वाल) आमटी शिजणारच! शुक्रवारच्या जिवतीच्या पूजनासाठी पत्री गोल करण्याची गडबड चालू होते. संध्याकाळी सवाष्णीना हळदी कुंकवाला बोलावून त्यांना दुध व भेंडीच्या पानात भिजलेले हरभरे (चणे) प्रसाद म्हणून देतात.

श्रीवर्धनला कोळीवाड्यात 'नारळी पौर्णिमा' अगदी दणक्यात साजरी होते. प्रत्येक घरामागे नारळी-सुपारीच्या बागा असल्यामुळे नारळ मुबलक! त्यामुळे नारळाचे नारळीभात, नारळीपाक असे आणि अनेक विविध पदार्थ यादिवशी केले जातात. संध्याकाळी तहसीलदार-कचेरीतून खास नारळ सजवून तो वाजत-गाजत गावातून फिरवला जातो व शेवटी समुद्रावर नेउन तो समुद्राला अर्पण करतात. यावेळी समुद्रावर नारळ खेळण्यासाठी व खेळ बघण्यासाठी गर्दी जमलेली असते. खेळण्यासाठी म्हणून खास बारीक व टणक नारळ निवडले जातात. या खेळात दोन खेळाडू समोरासमोर उभे राहून आपला नारळ चेंडू प्रमाणे टाकतात. यात नारळ एकमेकांवर आपटून फुटतो. ज्याचा नारळ फुटला तो गाडी बाद! हा खेळ अगदी अंधार पडेपर्यंत चालू राहतो. हा खेळ प्रत्यक्ष बघण्यात खरी मजा असते…( क्रमशः)

**-संगीता देसाई-कुळकर्णी**



**-प्रणोती नवरे**

# एका प्रवासाची चित्र-कथा: स्वित्झर्लंड






Vineyard Terraces of Lake Geneva Region Lavaux is a beautiful site of almost 800 hectors of lush green slopes of grape vines at the shores of Lake Geneva. The characteristic houses of winegrowers with bright red roofs add color and LA Vaux between Chexbres to Rivaz beauty to this scenery. This vineyard region has been protected as UNESCO Heritage Site since 2007.

त्या फुलांच्या गंधकोशी सांग तू आहेस का ...

Bernese Oberland(Swiss Alps)

Even on a cloudy and rainy day Alps still hold their grandeur beauty making the place heavenly and magical. Another interesting and moderate hike is from Grutschalp –Winteregg-Murren. From Murren there is a cable car that takes you to mount Schilthorn at an altitude of 2960 m, made famous by a James Bond movie.





Grindelwald to Bort hike: Bernese Oberland(Swiss Alps)
Each and every alpine hike keeps bringing magnificent views of Alps.  Grindelwald, surrounded by 300 km of walking trails and views of mountains of Eiger and Wetterhorn. This is the most popular tourist town and central place to get to various points of interests in Alps.  All hikes in Alps are marked with yellow signs of directions, destinations and the level of difficulty.

Switzerland and Cowbells: Long and rich tradition in Switzerland to keep track pf grazing cows in the hilly landscape.





Wengen and Lauterbrunnen valley Bernese Oberland(Swiss Alps)
Luter Brunnen means many fountains! Lauterbrunnen valley is situated between enormous rock faces with many free falling thunderous waterfalls, green meadows and colorful inns.   On one side, high in rocks lies the beautiful small typical alpine village of Wengen looking down the picturesque landscape of Lauterbrunnen valley.



Cows with cowbells:
Bernese Oberland(Swiss Alps)
Switzerland and Cheese go together! Swiss cow culture is unique in a way that this old fashioned farming has survived for so many years in high mountains and valleys. In summer cows are moved up to the high elevation alpine pastures and they return back to the valley at the end of the September. You will see herds of grazing cows and cowbells ringing making the rugged mountains come to life.



सादेती हिमशिखरे शुभ्र पर्वताची :
Glimpse of Jungfrau range
Bernese Oberland (Swiss Alps)



Alpine hike: Mannlichen - Kleine Scheidegg - Jungfrau range
Bernese Oberland(Swiss Alps)
This is the most beautiful hike in Swiss Alps with glorious mountain views. All the way through the hike, peaks of Eiger, Monch and Jungfrau will give you company on a bright sunny day. The plot is that young maiden Jungfrau is protected from the evil ogre Eiger by monk Monch! The Jungfraujoch is top of Europe at an altitude of 3454 m. To get to the top, there is a train




Reuss river banks: Lucerne
Lucerne is a beautiful tourist getaway to central Switzerland, situated at the edge of Lake Lucerne with panoramic views of mount Pilatus, Rigi, Titlis and Stansernhorn. It is a lovely city of town squares, churches and bridges where you can really enjoy walking. Lots of eateries overlooking the river are the best places to spend some lovely evenings. Don't miss the Lion mountain if you ever go to Lucerne.

Sail away with me...
Lake Lucerne
Cruising in Lake Lucerne is must. There are plenty of cruises available which offer various destinations with unlimited views mountain backdrops lacing the serene waters of Lake Lucerne.







Chapel Bridge and Water tower: Lucerne
Probably the oldest wooden covered bridge with old painting under the roof (dated back 14th century). The bridge is lined with beautiful flower display.

- गौरी धायगुडे

# रंगीबेरंगी बाल जगत






**-अर्णव जोशी**

# माशी झाला मंत्री

विदिशानगर नावाचे एक राज्य होते त्या नगरातली ही गोष्ट आहे. सुमंत नावाचा एक तरुण माणूस होता. तो छोटा असताना त्याचे आई-वडील गेले. एकटे राहून तो खूप धूर्त आणि हुशार झाला होता. एका दिवशी त्याला खूप भूक लागली होती. रस्त्यावर एक हलवायाचे दुकान होते. सुमंत लगेच आत गेला. दुकानवाला तेव्हा झोपलेला होता. त्याचा छोटा मुलगा दुकान चालवत होता. “तू कोण आहेस?” तो मुलगा म्हणाला. “मी तुझ्या बाबांच्या मित्राचा मुलगा आहे आणि माझं नाव माशी आहे” असे म्हणत लगेचच दोन लाडू उचलून सुमंताने खाल्ले. तो मुलगा त्याच्या पप्पांचा खोलीत गेला. “पप्पा, पप्पा, माशी लाडू खातोय! मी काय करू?”. पप्पा झोपेतच होते. ते म्हणाले, “ खाऊन खाऊन माशी किती खाणार? खाऊ  दे. आता जा मला परत उठवू नकोस.” बाहेर येउन बघतो तर सुमंतने सगळे लाडू आणि शंकरपाळे संपवले होते. त्याने दोन पेढ्यांचे डब्बे घेतले घरी जायला निघाला. त्याने दुकानवाल्याला एकही पैसा दिला नाही.

असं सुमंताने खूप लोकांना फसवलं. तिकडच्या राजालाही  सुमंता बद्दल तक्रारी गेल्या. एका दिवशी सुमंत पकडला गेला. राजा म्हणाला, “तू खूप लोकांना फसवलस त्याची तुला शिक्षा होयलाच हवी. माझे शिपाई तुला गोणीत घालून ठेवणार आहेत. उद्या सकाळी, तुला ह्या डोंगरावरून खाली टाकू.” सुमंताला त्यांनी गोणीत भरलं आणि डोंगरावर सोडलं. सुमंताने बाहेर कसे पडता येईल असा खूप विचार केला. तेवढ्यात त्याला एका हत्तीचा आवाज ऐकू आला. सुमंत जोरजोरात ओरडायला लागला, “मी राजा नाही होऊ शकत! वाचवा! वाचवा!” हत्तीवर एक माहूत बसला होता. तो खाली उतरला आणि त्याने गोण उघडली. सुमंत बाहेर आला. तो म्हणाला “राजाच्या हत्तीने माझ्या गळ्यात हार घालून माझी पुढचा राजा म्हणून निवड केली आहे . मी राजाला खूप सांगितलं कि मी एक साधा माणूस आहे.  पण राजा रागावला. मी माझा विचार बदलावा म्हणून त्याने मला गोणीत भरून ह्या डोंगरावर ठेवलं. मला मदत करा!”. हत्तीवाल्याला राजा होयचं होतं. तो सुमंतला म्हणाला,”मीच तुझी जागा घेतो, तू माझा हत्ती घे पण कोणालाही सांगू नकोस. तो माहूत गोणीत बसला.

सुमंत हत्ती घेवून राजाकडे गेला. सगळी गोष्ट कळल्यावर राजा म्हणाला, “सुमंत, तू खूप हुशार आहेस, पण तू फक्तं लोकांना फसवण्यासाठी तुझी हुशारी वापरतोस. पण आता चांगल्या कामांसाठी तुझी हुशारी वापरण्याची संधी मी तुला देतो. तू माझा मंत्री होशील?” सुमंतला आधी कोणीही अशी संधी दिली नव्हती. तो थोडा वेळ काहीच बोलू शकला नाही. मग मात्र सुमंताने ती संधी घेतली आणि विदिशा नगरातला सगळ्यात हुशार मंत्री झाला.

**मूळ कथा- सुधा मूर्ती**
**अनुवाद- रोहिणी जोशी**


एकदा गणपती शाळेत आला
आणि टीचरला म्हणाला
अभ्यास नको मला
भरपूर लाडू आणले बाप्पाने
स्नॅकसाठी
पोटभर खाल्ले आणि ढेकर दिली
मोठी!
तरी शिवाय लंचसाठी मोदक
आणि तूप
अशी केली गंमत
खूप खूप खूप!

-शरयु

**-शरयू जोशी**



-शाल्मली कुलकर्णी




**-सिद्धार्थ निरगुडकर**





**-आर्यन किन्हीकर**




**-स्वरा गुरव**




-विदुला कुंटे




-स्मिता भोगले



# गाणी - भाषा आणि परिभाषा

गाणे ह्या मराठी शब्दालाच इतका नाद आहे, नुसते "गाणे" हा शब्द म्हणताच काहीतरी लय, ताल, स्पंदन मना भोवती सुरु होतात. एखादे गाणे सकाळी उठल्या उठल्या आठवते/आईकू येते आणि दिवसभर मनात तेच ताल धरून असते. कधी रेडिओ वर ऐकले म्हणून, कधी शेजारी लागले म्हणून, आणि आज काल कुणीतरी फेसबुक वर पाठवले तर त्यावर टिचकी मारली जाते आणि त्यानेच दिवसाची सांगीतिक सुरुवात होते. बर्याचदा जे गाणे मनात राहते त्यावरून आजचा आपला "mood " कसा आहे हे सांगता येते. माझा स्वतः वरून निघालेला एक तर्क बरका! तेच गाणे मग गाडी चालवताना, आघोलीच्या वेळेस, पोळ्या करताना, व्यायाम करताना, थोडक्यात सर्व मोकळ्या वेळात डोक्यात असते. कधी कधी ना आवडणारे गाणे सुद्धा असेच ओठावर राहते नकळत आणि छळ होतो आपलाच. लौकर विसरले पण जात नाही. आणि तेच गाणे का आठवले आणि कसे विसरता येत नाही, ह्याचा शोध मला कधीही लागलेला नाहीये. असो.

कुठलेतरी गाणे आवडायला सहसा भाषेचे बंधन नसते. कधी हिंदी, मराठी, इंग्रजी, नाहीतर न समजणारी भाषा सुद्धा चालते. परवा असेच सकाळी सकाळी फेसबुक वरून कैशिकी चक्रवरती च्या एका बंगाली गाण्याची नोंद होती, सहज म्हणून आईकायाला गेले, ते इकते आवडले, २-३ दिवस तेच गाणे डोक्यात घोळत होते. आता गाणे, ज्याची भाषा कळत नाही ते डोक्यात घोळते म्हणजे काय होते नक्की? त्याचे संगीत, गायकाचा आवाज, अर्थ समजला असेल तर, असे सर्वांचे एकत्रित फळ-स्वरूप एकदम आवडून राहते. अप्रत्यक्षपणी आपण ते अंगवळणी पाडून घेतो. व्यक्ती तितक्या प्रकृती, प्रत्येक माणूस वेगळा, त्याच्या रुची वेगळ्या, अभिरुची वेगळ्या आणि मुख्य म्हणजे कालानुरूप बदलत जाणार्या. त्यामुळे कधी आपल्याला कुठले गाणे आवडेल सांगता येत नाही. पूर्वी हे गाणे मला खूप आवडायचे आता नाही आवडत असे होतेच की. किवा पूर्वी आवडत नसे पण आता खूप आवडायला लागले आहे, अनेक बाबतीत जे होते तेच. गाणी ही त्याला अपवाद नाहीत.

काही गाणी खूप विचार करायला लावतात, ती गुणगुणत असताना किंवा झाल्यावर बर्याचदा त्याचा अर्थ स्मरत राहतो. काही काही वेळी नेमकी आणि योग्य गाणी त्या आठवण ही एक पर्वणीच ! (आता

वायोमाने खूप मोलाची होत चालेली पर्वणी)  विशेषतः पाउसाळी वातावरण आणि पाउसाचा ओला गंध हा हमखास  रोमांचकारी, नव-नवीन कविता -गाणी सुचविणारा आणि आठवण करून देणारा. तसेच हिंदी मधला शायरी/गझल हा गीत-संगीत प्रकार ह्या वातावरणात हमखास आठवतो.

शेवटी गाणं गाणं म्हणजे तरी काय, काही एकत्र शब्द, त्याला नाद, त्याला अर्थ, त्याला मर्म, त्याला लय, त्याला पकड. कुठेतरी ते भिडत. कित्येकदा दिवसभर पेटी घेऊन बसलेले संगीतकार, गीतकार  किवा गायक त्या गाण्याशी एकरूप झाले असतील किवा नसतील पण त्याच ओळी  कुणाला कुठे कधी भिडतील सांगता येत नाही. तल्लीनता ज्याची त्याची वेगळी. गाणे, गीत, संगीत, शब्द, भावना हे सर्व इतके एकमेकात गुंतले आहे. मोकळे करून त्याचा अभ्यास मोठा विषय आहे खरा, पण त्याचा एकत्रित अनुभव आणि आनंद किती गरजेचा आहे आपल्यादैनंदिन जीवनात. एवढा मोठा हिंदी मराठी चित्रपट गाण्यांचा साठा, अनेक भाव-भक्ती गीते, लावण्या, गझल, शास्त्रीय, उप-शास्त्रीय, ते अगदी पॉप गाणी सुद्धा आपण आईकतो, म्हणतो, सतत गुणगुणतो. ही चैन खूप मोलाची आणि म्हणूनच इतक्या जिव्हाळ्याची. ती अशीच वृद्धिंगत होत राहो!

गाणे बोलते मजसी
करते हितगुज मनीचे
अबोल राहुनी स्वतः
भिडती गंध नभीचे.

**-प्रिया वैद्य**

# मागील अंकावरील वाचकांच्या काही प्रतिक्रिया




संपादक 'अनुबंध',
इतका सर्वांगसुंदर अंक वाचण्यास उपलब्ध करुन दिल्याबद्दल अभिनंदन व धन्यवाद.
मुखपृष्ठापासून शेवटपर्यंत देखणा व वाचनीय दर्जेदार अंक.
देखणे मॅग्नोलिया मुखपृष्ठ
वाचनीय आढावा घेणारे संपादकीय
सुटसुटीत अंतरंग
मुद्देसूद अध्यक्षीय मनोगत
मुलांना व्यक्त व्हायला,बहरण्यासाठी खुले व्यासपीठ बालजगत
एवढीशी मोहरी व ओंजळीतली फुले- राई व सुपारी बद्दल रोचक माहिती देणारे लेख
जीवननौका- मार्मिक लेख
मेनापॉज विषयक मार्गदर्शनपर उत्तम लेख म्हटलं तर
एका लग्नातली एका लग्नाची गोष्ट व मोरवेडी- सुंदर कथा
कितीक राहीलेल्या वाटा- काळजात रुतलेली कविता
भारतीय राग संगीत-एक अनुभव- विशेष माहितीपूर्ण लेख
दिप्ती रेटे यांनी रेखाटलेले सुंदर स्केच व प्रियांका बिडकरांनी काढलेले सुंदर चित्र
तसेच मागील अंकाच्या प्रतिक्रिया देत आढावा घेण्याचा केलेला प्रयत्न
या सर्वांचे सुंदर मिश्रण म्हणजे एक संपन्न समृद्ध इंद्रधनुष्यी अंक वाचकांच्या मनात वसलेला 'अनुबंध'.
आपल्या अंकाच्या पुढील वाटचालीस अनेक शुभेच्छा...

-अल्पना कशाळकर

अनुबंध चा जुन अंक वाचला . तुमच्या संपादकीय पासून रामचंद्र जोशींच्या संगीतावरील लेखापर्यंत अंक वाचनीय आहे . लहान मुलांसाठी चालू केलेलं सदर खास उल्लेखनीय. त्यांचा आपल्या मातृभाषेशी असलेल नात जपण्याचा प्रयत्न नक्कीच प्रशंसेस पात्र , विशेषत: परदेशात राहून पाश्यात्त संस्कृतीत वाढणार्या या मुलांच कौतुक कराव तेवढ थोड .
मिलिंद जोशींची एवढीशी मोहरी लेख चुरचुरीत . प्रिया वैद्यांची कविता मनातली तगमग व्यक्त करणारी सुधन्वा आगवेकरांची "एका लग्नाची... लग्नातली गोष्ट " , आणि ज्योती जोशी यांची "मोरवेडी " गोष्ट अप्रतिम.
ओंजळीतील फुले सदर वाचताना माझ्या गोव्यातील सासुरवाडीच्या सुपारीच्या बागा डोळ्यापुढे उभ्या राहिल्या . एकंदरीत अंक टवटवीत वाटला .
पुढील अंकासाठी शुभेच्छा , वाट पाहत आहे .

आपला;
श्रीनिवास जांभेकर





-अनिल वेर्णेकर